**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**
**पथकिनारवर्ती नियमात एकसुत्रता आणण्यासाठी इमारत रेषा व नियंत्रण रेषा याकरीता घ्यावयाची अंतरे लागु करण्याकरीता कलम-१५४ अन्वये निदेश.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१९/अनौसं-३६/१९/नवि-१३**
**दिनांक- ०५/०८/२०१९**

**वाचा** - १. शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.आरबीडी१०९५/(१६९२)/रस्ते-७, दि.१३.११.१९९५
२. शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.आरबीडी-१०८१/८७१/रस्ते-७, दि.०९.०३.२००१
३. शासन निर्देश नगर विकास विभाग क्र.संकीर्ण-२००२/अनौ-२९८/प्र.क्र.२५८/०३/नवि-१२, दि.१०.०६.२००४
४. शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.आरबीडी-२००४/प्र.क्र.२६/रस्ते-७, दि.०७.०७.२००५
५. शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.रवियो-२०१८/प्र.क्र.१०७/नियोजन-२, दि.१३.०६.२०१८
६. शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.आरबीडी-२०१८/प्र.क्र.१३८/रस्ते-७, दि.२१.०१.२०१९

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

रस्त्याच्या बाजूने होणाऱ्या वसाहतीमुळे रस्त्यावरील वाहनांच्या वाहतुकीस अडथळे निर्माण होतात. त्याचप्रमाणे अशा वसाहतींमध्ये येणारी वाहने थांबल्यामुळे वाहतुकीस अडथळा येतो. वसाहतींची ही अनिर्बंध वाढ रोखण्यासाठी पथकिनारवर्ती नियम तयार करण्यात आलेले आहेत. या पथकिनारवर्ती नियमात इमारत रेषा व नियंत्रण रेषा किती अंतरावर असाव्यात हे मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५ महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६९, केंद्र शासनाच्या भूपृष्ठ मंत्रालयाचे दि.१३/१/१९७७ च्या मार्गदर्शक सुचना व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

या संदर्भात इमारत रेषा व नियंत्रण रेषा यांच्या अंतरामधील जनतेच्या मनातील संभ्रम टाळण्यासाठी आणि एकसुत्रता असावी यासाठी संदर्भ क्र. ६ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सर्वंकष अभ्यास करून काही शिफारशी केल्या आहेत. त्या शिफारशी विचारात घेता उपरोक्त संदर्भ क्र.१ ते ५ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासन आता याव्दारे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये पुढीलप्रमाणे सुधारीत निदेश देत आहे.

**निदेश**

१) भविष्यात नागरी व औद्योगिक भागात आणि अनागरी भागासाठी इमारत व नियंत्रण रेषेसाठीची कमाल अंतरे खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | रस्त्याचा दर्जा | इमारत रेषा | | नियंत्रण रेषा (फॅक्टरी, सिनेमा हॉल, व्यापारी गोडाऊन, मार्केट इ. गर्दी होईल अशी ठिकाणे) | |
|---|---|---|---|---|---|
| | | नागरी व औद्योगिक भाग | अनागरी भाग | नागरी व औद्योगिक भाग | अनागरी भाग |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | द्रुतमार्ग मार्ग | रस्त्याच्या मध्यापासून ६० मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून १५ मी., यापैकी जास्त असेल ते | रस्त्याच्या मध्यापासून ६०मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून १५ मी., यापैकी जास्त असेल ते | रस्त्याच्या मध्यापासून ६०मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून १५ मी., यापैकी जास्त असेल ते | रस्त्याच्या मध्यापासून ६० मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून १५ मी., यापैकी जास्त असेल ते |
| २ | राष्ट्रीय महामार्ग | रस्त्याचा हद्दीपासून ३ ते ६ मी. | रस्त्याचा मध्यापासून ३७ मी. | रस्त्याचा हद्दीपासून ३ ते ६ मी. | रस्त्याचा मध्यापासून ५०मी. |
| ३ | राज्य महामार्ग व प्रमुख राज्य महामार्ग | रस्त्याच्या मध्यापासून २० मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५ मी., यापैकी जास्त असेल ते | रस्त्याचा मध्यापासून ३७ मी. | रस्त्याच्या मध्यापासून २०मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५मी., यापैकी जास्त असेल ते | रस्त्याचा मध्यापासून ५० मी. |
| ४ | प्रमुख जिल्हा मार्ग | रस्त्याच्या मध्यापासून १५ मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५ मी., यापैकी जास्त असेल ते | रस्त्याचा मध्यापासून ३० मी. | रस्त्याच्या मध्यापासून १५मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५मी., यापैकी जास्त असेल ते | रस्त्याचा मध्यापासून ४० मी. |
| ५ | इतर जिल्हा मार्ग | रस्त्याच्या मध्यापासून १२ मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५ मी., यापैकी जास्त असेल ते | रस्त्याचा मध्यापासून १२ मी. | रस्त्याच्या मध्यापासून १२मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५मी., यापैकी जास्त असेल ते | रस्त्याचा मध्यापासून ३० मी. |
| ६ | ग्रामीण मार्ग | रस्त्याच्या मध्यापासून १० मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ३ मी., यापैकी जास्त असेल ते | रस्त्याचा मध्यापासून १० मी. | रस्त्याच्या मध्यापासून १०मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ३ मी., यापैकी जास्त असेल ते | रस्त्याचा मध्यापासून २५ मी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | डोंगराळ भागातून जाणारे रस्ते (द्रुतगती मार्ग वगळता सर्व रस्ते) | रस्त्याच्या हद्दीपासून ५ मी. | रस्त्याच्या हद्दीपासून ५ मी. | रस्त्याच्या हद्दीपासून ५ मी. | रस्त्याच्या हद्दीपासून ५ मी. |

२. नागरी भागातून म्हणजेच कोणत्याही कायद्यान्वये गठीत करण्यात आलेल्या नागरी स्थनिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातून जाणारे सर्व रस्ते हे नागरी वस्तीतून जात असल्यामुळे अशा राष्ट्रीय महामार्ग/ राज्य महामार्ग अथवा द्रुतगती मार्गांना व अन्य दर्जाच्या रस्त्यांना त्या शहराचे विकास योजना रस्ते (D.P.Roads) म्हणून समजण्यात यावे व अशा विकास योजना रस्त्यांसाठी (D.P.Roads) त्या शहराच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीप्रमाणे पुढील सामासिक अंतरे प्रस्तावित करण्यात यावीत. तसेच अशा विकास योजना रस्त्यांसाठी (D.P.Roads) त्या-त्या शहरांचे विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये नियम अस्तित्वात नसल्यास त्यांचा दर्जा राज्य मार्गाचा समजण्यात यावा व अशा रस्त्यांसाठी नागरी भागातील राज्य मार्गासाठी विहीत करण्यात आलेली इमारत व नियंत्रण रेषांची अंतरे लागू राहतील.

३. ज्या नागरी भागात मूळ राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग आणि द्रुतगती मार्गासाठी वळण रस्ता बांधण्यात आलेला आहे असा, गावठाण/नगरपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रातील वळण रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली राहील. अशा रस्त्यांची देखभाल दुरुस्ती संबंधित अभिकरणाने करावी.

४. नागरी भागांच्या बाबतीत ज्यावेळी मूळ वर्गीकृत रस्त्यासाठी वळण रस्त्याची बांधकामे पूर्ण होतील, त्यावेळी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतून जाणारे मूळ वर्गीकृत रस्ते आपोआप अवर्गीकृत (Deemed Declassified) होतील. अशाप्रकारे मूळ वर्गीकृत रस्ते अवर्गीकृत झाल्यानंतर व सदर रस्त्याची मालकी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने मागितल्यावर त्यांचेकडे त्वरीत हस्तांतरित करावेत.

५. ज्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळातर्फे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात येऊन रस्त्याच्या बाजूस सेवा रस्ता विकसित करण्यात आलेला आहे. त्या भागात वरील नियम लागू होणार नाहीत. त्या भागात सेवा रस्त्याच्या पलिकडे होणारी बांधकामे ही महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या नियमानुसार होतील.

६. नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रात शासनाच्या रस्त्याच्या हद्दीपलीकडे स्थानिक संस्थेने सेवा रस्त्याची आखणी करुन ते बांधावेत. नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीतील जुन्या गावठाण किंवा अगोदरच विकसित झालेल्या भागामध्ये राज्यमार्गाच्या हद्दीत सेवा रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधण्यात यावेत. नियोजन प्राधिकरणाकडून सेवा रस्ता बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे परवानगी बाबत विनंती आल्यास, राज्य शासनाच्या रस्त्याच्या हद्दीत किमान ३० मीटर जागा उपलब्ध असल्यास कडेपासून ७.५ मीटर रुंदीचा सेवा रस्ता बांधण्यास संबंधित प्राधिकरणास परवानगी राहील. मात्र स्थानिक संस्थांच्या नवीन वाढीव हद्दीत सेवा रस्त्याची तरतूद विकास आराखड्यात करावी व सेवा रस्ते स्वखर्चाने बांधून पूर्ण करावेत.

७. सेवा रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधण्यात यावेत. ज्या ठिकाणी उपरोक्त मुद्दा क्र.(६) मध्ये नमूद केल्यानुसार नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीत सेवा रस्ता बांधण्यासाठी नियोजन प्राधिकरणाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे परवानगीबाबत विनंती आल्यास त्या ठिकाणी

सेवा रस्ते स्थानिक स्वराज्य संस्थांतर्फे बांधण्यात यावेत. राज्यमार्गाला जागोजागी छेद दिले जाणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

८. शासनस्तरावर पथकिनारवर्ती नियमात कोणत्याही प्रकारची शिथीलता देण्यात येणार नाही. सबब यापुढे पथकिनारवर्ती नियमात शिथीलता देण्याबाबतचे प्रस्ताव महसूल व वन विभागाकडून अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शासनास सादर करण्यात येणार नाहीत व अशी शिथीलता देण्यात येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार

Shrirang Digambar Landge

Digitally signed by Shrirang Digambar Landge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0244b1e4f6e7f1439683b9854a9f8092c0c62c3f3307d9e0b1018ff7cf995bfe, cn=Shrirang Digambar Landge
Date: 2019.08.05 17:28:53 +05'30'

**( श्री. दि. लांडगे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. प्रधान सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
मा. सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
मा. सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, सेंट्रल बिल्डींग, पुणे.
सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग (विद्युत वगळून)
सर्व महसूल आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व अधीक्षक अभियंते.
सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना.
उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे.
सर्व कार्यकारी अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग/जिल्हा परिषद.
सर्व शाखा कार्यालय, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग.
सर्व महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत/ग्रामपंचायत.
निवडनस्ती - नवि-१३.

********